# महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१

Website: www.jdhepune.org E-mail – jdhepune@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, ०२०-२६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२


क्र.शिससं/उशि/पुवि/नाहप्र-शिक्षक भरती/२०२२ १४६४ दि. २७/५/२०२२

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय - **उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापक पदभरतीसाठी नाहरकत प्रमाणपत्र मागणीसाठी प्रस्ताव विहित प्रणालीद्वारे सादर करणेबाबत..**

संदर्भ - संचालनालयाकडील पत्र क्र. पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/५४६५ दिनांक २०.५.२०२२.

उपरोक्त विषयास अनुसरुन पदभरतीसाठी पात्र असणा-या सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शासन निर्णय क्र. आढावा-१५१३/प्र.क्र.१२५ (भाग-८) म.शि.५ दि. १२ नोव्हेंबर, २०२१ अन्वये एकूण २०८८ शिक्षकीय पदांच्या पदभरतीस राज्यात मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर केंद्र शासनाच्या आरक्षण धोरणाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाचा दि. २५.१.२०२२ च्या अधिनियमान्वये आरक्षण धोरणामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार उच्च शिक्षण विभागाकडून दि. ७.४.२०२२ रोजी अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच दि. ११.४.२०२२ च्या शासन निर्णयानुसार आरक्षण धोरणाचा अवलंब कसा करावा याबाबतची मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

याबाबत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दि. ४.५.२०२२ रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. दि. १५.५.२०२२ पर्यंत सर्व महाविद्यालयांनी संबंधित प्राधिकरणांकडून बिंदुनामावली निश्चित करुन घेण्यात यावी व नाहरकत प्रमाणपत्रासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा अशा सूचना मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिलेल्या आहेत. **याबाबत निर्देशित करण्यात येते की, बिंदूनामावली संबंधित प्राधिकरणाकडून निश्चित करुन दिनांक १५ जून २०२२ पर्यंत निश्चितपणे नाहरकत प्रमाणपत्र मागणीसाठी प्रस्ताव विहित प्रणालीद्वारे सादर करण्यात यावेत. विषयांकित प्रकरणी उपरोक्त सूचनांप्रमाणे विहीत कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करण्याची कार्यवाही पदभरतीसाठी पात्र असणा-या सर्व महाविद्यालयांनी करावी.**

आपला विश्वासू,

(डॉ. किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे.

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविनय सादर.